वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटप व जाहीर ठरावाकरीता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.४ यांनी दावा मिळकत गट नं.८१३/1 बाबत प्रतिवादी क्र.६ यांस बेकायदेशीर खरेदीखत करुन दिले होते. प्रतिवादी क्र.६ ने सदर दावा मिळकत ही पुन्हा नागेश प्रकाश जंगम यांना विकलेली असून त्याबाबत सदर वादीने दुरुस्ती मागितली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्ज मान्य व कबूल नाही. सबब, अर्ज नामंजुर व्हावा. विकल्पेकरुन अर्ज मंजुर झाल्यास जास्तीत जास्त खर्च देण्याचा आदेश व्हावा.

३. वादीचे व सदर प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादींनी सदर खरेदीखताची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. प्रस्तुत दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र.६ यांनी त्रयस्थ इसम नागेश जंगम यांना दावा मिळकत विक्री केलेली आहे. सदर इसमांना दाव्यामध्ये सामील करणे गरजेचे आहे. त्यामुळे त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामुळे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकारांना समाविष्ट करणे गरजेचे आहे. सदर पक्षकार दाव्यामध्ये सामील केल्यास दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. सबब, दाव्यांचे अनेकीकरण टाळण्यासाठी वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीस खरेदी घेणार त्रयस्थ इसम नागेश प्रकाश जंगम यांना दाव्यामध्ये प्रतिवादीपणात सामील करण्याची व त्याअनुषंगाने प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३.	वादींनी सदरची दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI

Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2024.10.08 17:58:02 +0530

**( एस. सी. साळवी )**

**दि.०८.१०.२०२४** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**पारनेर** **पारनेर**